**॥ॐ श्री साईनाथाय नमः॥**

# वंदनीय श्री सद्‌गुरुनाथ दादा (भागवत)

**कृपास्थापित**

## ‘दादर कार्यकेंद्र’

## श्रीखंडोबा षड्‌रात्रपूजन विधी (पत्रक)

**श्री साई शक ३९**

**(दिनांक १५ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२०)**

**सूचना : सोमवार दि. १४ डिसेंबर २०२०** (कार्तिक अमावस्या) रोजी मांडलेले अनुष्ठान हलवून **मंगळवार दि. १५ डिसेंबर २०२०** (मार्गशीर्ष शुध्द प्रतिपदा) या दिवशी षड्‌रात्र अनुष्ठान मांडावे.

---

* **मंगळवार दि. १५ डिसेंबर २०२०** (मार्गशीर्ष शुध्द प्रतिपदा) ते **रविवार दि. २० डिसेंबर २०२०** (मार्गशीर्ष शुध्द षष्ठीपर्यंत) हा **‘षड्‌रात्रपूजन विधी’** खालीलप्रमाणे करावा.

**साहित्य :** नित्यपूजन विधी साहित्य + गोमूत्र (किंवा हळद-कुंकू घातलेले पाणी), रांगोळी, पाट, अक्षता, पंचामृत, कोमात पाणी, विडा (२ पाने व १ सुपारी), रु. २१/- दक्षिणा, एक श्रीफळ, एक फळ, एक वाटी सुके खोबरे व हळद (भंडारा), आंब्याच्या पानांचे तोरण व आंब्याची डहाळी.

**पूजनविधी :**

१) • सर्वप्रथम एका भांड्यात पाणी घेऊन त्यात गोमूत्र किंवा हळद-कुंकू घालावे. हे पाणी आंब्याच्या किंवा विड्याच्या तीन पानांनी घरात सर्वत्र शिंपडावे.
   • दरवाज्यावर आंब्याच्या पानांचे तोरण बांधून मधोमध आंब्याची डहाळी लावावी. तसेच, दरवाजाबाहेर उंबरठ्यावर रांगोळी काढावी.

२) खालील प्रार्थना करून पूजन विधीस प्रारंभ करावा.
   **प्रार्थना : ‘गुरुआज्ञेने मी माझ्या कुटुंबातील कुलधर्म भावी काळासाठी निश्चित केला असून जी सेवा माझ्या हातून घडेल, ती आपण सर्व देवदेवतांनी मान्य करून घ्यावी.’**

३) घरातील इतर देवांच्या पूजेची प्राथमिक तयारी करावी.

४) • पूजनाची जागा गोमूत्र किंवा पंचामृताने शुद्ध करून घ्यावी.
   • हळद-कुंकवाचे स्वस्तिक 卐 काढून त्यावर पाट मांडावा. पाटाभोवती रांगोळी काढावी.
   • पाटावर हळद-कुंकवाचे पृथ्वीतत्त्व ✡ काढावे व त्यावर अक्षतांनी भरलेले ताम्हन ठेवावे.
   • ताम्हनामधील अक्षतांवर हळद-कुंकवाचे पृथ्वीतत्त्व ✡ काढावे.

५) • गुरुकृपेने प्राप्त झालेल्या श्रीसाईशक, श्रीकारण, श्रीमहाकारण व श्रीनारायणी या प्रतिमांना प्रथम पंचामृत व त्यानंतर कोमट पाण्याने स्नान घालून स्वच्छ पुसून घ्याव्यात.
   • त्यांपैकी श्रीसाईशक, श्रीकारण व श्रीमहाकारण या प्रतिमा डबीत घालून, ती डबी झाकण न लावता किंवा लावून अक्षतांवर काढलेल्या पृथ्वीतत्त्वावर, ताम्हनात ठेवावी. तसेच, श्रीनारायणी प्रतिमाही आसनासहित त्या डबीशेजारी, ताम्हनात ठेवावी.
   • अनुष्ठानासमोर एक श्रीफळ, रु. २१/-चा विडा, भंडारा (खोबरे वाटी व हळद) व एक फळ, ठेवावे. विडा व श्रीफळावर हळद-कुंकू वाहावे.

- फुलास गंध, हळद-कुंकू लावून ती प्रतिमांवर / डबीवर वाहावीत.
- नंतर उदबत्ती, साजूक तुपाचे निरांजन ओवाळून व दूध-साखरेचा नैवेद्य दाखवून सर्व देवांचे व प्रतिमांचे पूजन करावे.
- कमीतकमी एक आरती म्हणावी. त्यानंतर **मंगलाचरण** (सजयति), **श्रीशक्तिपीठ प्रार्थना** (आम्ही गुरुभक्त) म्हणावी. **एकवीस वेळा महामंत्र** (सर्व मंगल मांगल्ये) म्हणावा. शेवटी **दैनंदिन प्रार्थना** म्हणावी.
- सायंकाळीही उदबत्ती, साजूक तुपाचे निरांजन व दूध-साखरेचा नैवेद्य दाखवावा व किमान एक आरती म्हणावी.

टीप : सकाळी काढून ठेवलेले फळ (श्रीफळ नव्हे) प्रसाद त्यादिवशी घरात घ्यावे.

६) • चंपाषष्ठीपर्यंत दररोज सकाळी प्रतिमांवरील / डबीवर निर्माल्य बाजूला काढावे व एका फुलाने सर्व प्रतिमांवर पाणी सिंचन करावे. दुसऱ्या फुलांना गंध-हळद-कुंकू लावून ती फुले प्रतिमांवर / डबीवर वाहावीत. (चंपाषष्ठीच्या दिवशीही प्रतिमा हलवू नयेत). इतर देवांचेही नित्यापूजन करावे. त्यावेळी प्रत्येक दिवशी त्यानंतर उदबत्ती, निरांजन, दूध-साखरेचा नैवेद्य व किमान एक आरती असे पूजन करावे.
- तसेच प्रत्येक दिवशी सायंकाळीही उदबत्ती, निरांजन, दूध-साखरेचा नैवेद्य असे पूजन करावे व किमान एक आरती म्हणावी.

७) चंपाषष्ठीच्या दुसऱ्या दिवशी : **(२१ डिसेंबर २०२० रोजी)**
- मांडलेले अनुष्ठान हलवावे व प्रतिमा धुऊन-पुसून पूर्ववत पूजनात ठेवाव्यात.
- पहिल्या दिवशी ठेवलेले श्रीफळ व ताम्हनातील अक्षता प्रसाद म्हणून घरात वापरात घ्याव्यात.
- घरातील सर्वांनी थोडीशी हळद कपाळाला लावून उर्वरित भंडारा (खोबऱ्याची वाटी व उरलेली हळद) वापरात घ्याव्यात.
- **रु. २१/-**चा विडा (सुकलेली पाने बदलून), कार्यकेंद्रावर नेऊन परमपूज्य बाबांच्या चरणी, तबकात अर्पण करावा.

**सूचना : ज्यांच्याकडे प्रतिमा नसतील त्यांनाही षड्रात्रपूजन विधी वरीलप्रमाणेच करता येईल. फक्त प्रतिमांचे अनुष्ठान व त्याप्रीत्यर्थचे सर्व औपचार करू नयेत.**

टीप :
- ज्यांचे कुलदैवत श्रीखंडोबा आहे, त्यांनीच हे अनुष्ठान मांडणे आवश्यक आहे. इतर भक्तभाविकांना हे अनुष्ठान मांडणे ऐच्छिक आहे.
- तसेच, ज्यांचे कुलदैवत श्री खंडोबा असून, ज्यांच्याकडे पूर्वापार परंपरेने श्री खंडोबाचा टांक आहे, त्यांनी त्या टांकाचे पूजन नेहमीप्रमाणे करावे. वरील अनुष्ठानामध्ये तो टांक मांडायची आवश्यकता नाही.
- चंपाषष्ठीच्या दिवशी **(२० डिसेंबरला)** वांग्याचे भरित, भाकरी, पुरण असा नैवेद्य दाखवावा (ऐच्छिक).
- चंपाषष्ठीच्या दिवशी **(२० डिसेंबरला रोजी)** सकाळी, कार्यकेंद्रावरील ऑनलाईन तळी आरतीचा लाभ **zoom app** वरून घ्यावा.

**।। शुभं भवतु ।।**